The Berar General Education Society's
Sitabai Arts, Commerce & Science College, Akola



Dr. R. D. Sikchi
Principal & Convener

Dr. Prasannajit R. Gawai
Hod Of Economics &
Organizing Secretary

SRJIS

SCHOLARLY RESEARCH JOURNALS
Sr-No 5+4/5+4, TCG'S Sai Datta Niwas, Phase-II, Wing-D, Flat No. 104,
Near Telco Colony, Jambhulwadi Road, Dattanagar, Ambegaon (kh), Pune-46 ,
Website: www.srjis.com, Email : dryashdnet@gmail.com

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

UGC Jr.No.62759 UGC Approved Refereed Journal

6th ANNIVERSARY

Vidyawarta®



Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

विद्यावार्ता

UGC Approved Jr.No.62759

Jan. To March 2018
Issue-21, Vol-04

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) DEVELOPMENT WITH WOMEN EMPOWERMENT IN INDIA
MEHZABEEN SULTANA , Gauhati University
|| 72

15) "A COMPARATIVE STUDY OF FINANCIAL ANALYSIS OF THE PIJ ....
Jaydev M. Vithlani, Anand
|| 77

16) चंद्रपूर जिल्हयातील मोठया व मध्यम उद्योगातील स्थान निर्देशांकाचे ...
डॉ. राजेंद्रकुमार डांगे & प्रा. प्रकाश रामभाऊ रामटेके जिल्हा. चंद्रपूर
|| 82

17) "आश्रमशाळेत शिकणा-या इयत्ता ८वी तील आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा शैक्षणिक ...
डॉ. आशा म. धारस्कर-भावसार , अकोला
|| 85

18) लोकसंख्या : जग आणि भारत
प्रा.डॉ. प्रान्जु रा.हिरेखण, यवतमाळ
|| 91

19) स्त्रियांच्या नव्वदोत्तरी कथेतील सामाजिक पर्यावरण
डॉ. प्रल्हाद होंडे जि. जालना
|| 95

20) लोकसाहित्यातील इहवाद
प्रा.डॉ.विजय पाटील, जाफ्राबाद
|| 99

21) संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार
प्रा. डॉ.ममता इंगोले (महल्ले), जि.अकोला
|| 101

22) सर्वासाठी घरे आणि घरात छोटीशी ग्रंथालये रू एक अभिनव...
प्रा.दिलीप गोविंदा पाटील, जिल्हा— रायगड (महाराष्ट्र)
|| 107

23) तुकाराम महाराजांच्या अभंगातून व्यक्त होणारे आध्यात्मिक विचार रत्न
डॉ यशोद श्रीमंतराव पाटील , औरंगाबाद
|| 110

24) 'हिंदी के उपन्यासों में आदिवासी विमर्श'
प्रा.डॉ.डी.एम.टिळेकर, जि.पुणे (महाराष्ट्र)
|| 112

25) मध्यकालीन संगीत और कला तथा राज्य आश्रय
Sachin Agnihotri ,Shahbad Bhoor,BAREILLY (UP)
|| 117

26) वर्तमान में सांस्कृतिक मूल्यों के पुर्नस्थापन में विवेकानन्द के व्यवह्त ...
डा० निशा अग्रवाल, मथुरा।
|| 123

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Jr.No.62759
Vidyawarta®
Jan. To March 2018 Issue-21, Vol-04
0101

21

संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार

प्रा. डॉ.ममता इंगोले (महल्ले)
सहयोगी प्राध्यापक, भाषा विभागप्रमुख,
डॉ. एच.एन.सिन्हा महाविद्यालय, पातूर जि.अकोला

१)प्रस्तावना —

" यो देवो अग्नौ योप्सु
यो विश्वं भुवनमाविवेश
य ओषधीषु यो वनस्पतिषु
तस्मै देवाय नमो नमः "

निसर्ग हेच परमेश्वराचे नांव आहे. देव अग्नित आहे, जलात आहे, जो सर्व विश्वात सामावलेला आहे तोच देव औषधी, तथा वनस्पतीमध्ये विद्यमान आहे. त्या देवाला माझा नमस्कार आहे. असे निसर्गाच्या संदर्भातील चिंतन प्राचीन ग्रंथात आणि संत साहित्यात प्रभावीपणे मांडलेले पहावयास मिळते. मानवी जीवन समशध्द होण्यासाठी संतांनी भक्तितत्व, अध्यात्मचिंतन आणि तात्वीक मूल्यांची शिकवण दिली. ज्या देहाचा आधाराने परमात्म स्वरूपाकडे जायचे आहे, तो देह निरोगी, सुदश्ढ, प्रसन्न, आनंदी राहावा यासाठी विपुल, व्यापक,शुध्द निसर्ग सान्निध्यात त्याने वावरले पाहीजे अशी त्यांची धारणा होती. मराठी संतांनी आपल्या वाङ्‌मयातून वश्क्ष, वल्ली, डोंगर, नदी, फुले, फळे, पशू, पक्षी, वारा, सूर्य, चंद्र, तारे, कीटक, गायी, गुरे, वने, अरण्ये, पाऊस इ. घटकांना रूपक,उपमा, सिध्दांत,दृष्टांताच्या स्वरूपात अधोरेखीत करत पर्यावरणाची नवी दृष्टीच दिली. यामध्ये संत परंपरेचा कळस ठरलेल्या संतश्रेष्ठ तुकारामांचा पर्यावरणविचार अत्यंत मोलाचे व कालातीत असे आहेत. त्यांच्या विचारांना आपल्या जीवनात स्थान देऊन त्यांची अंमलबजावणी केल्यास ढासळणाऱ्या पर्यावरणाला तोंड देण्याची शक्ती आपल्यात निर्माण होईल.

२)पध्दतीशास्त्र —

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबविण्याकरीता आवश्यक बाबी संतश्रेष्ठ तुकारामांच्या विचारांमधून आपल्याला मिळतात. संतश्रेष्ठ तुकारामांच्या अभंगातून आलेले पर्यावरणविचार जागतीक तापमान वाढीच्या समस्येवर उपाय सुचविणारे आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनाकरीता संशोधकाने ' संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार ' हा विषय निवडला आहे. पर्यावरण, ढासळलेले पर्यावरण आणि ढासळत्या पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी दिशा देणारे पर्यावरण संदर्भातील तुकारामांचे विचार या त्रिसूत्रातून प्रस्तुत शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

३)गृहीतकृत्ये—

१) संतश्रेष्ठ तुकारामांच्या अभंगातून पर्यावरण विचार पदोपदी जाणवतात.

२) संतश्रेष्ठ तुकारामांच्या अभंगातून पर्यावरणाचे संतुलन राखण्यासंबंधीची दिशा मिळते

३) संतश्रेष्ठ तुकारामांच्या विचारांची अंमल बजावणी करून पर्यावरणाचा समतोल राखता येईल

४) संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार वसुंधरेच्या रक्षणासाठी उपयोगी ठरतील.

४)संशोधनाचा उद्देश —

मानवाने आपल्या स्वार्थासाठी चालविलेल्या पर्यावरण ऱ्हासामुळे पृथ्वीचे पर्यायाने मानवाचेच जीवन संकटात सापडलेले आहे. अशावेळी पर्यावरणविषयक जनजागृतीसाठी संतश्रेष्ठ तुकारामांचे विचार प्रेरक ठरतात. या पार्श्वभूमीवर त्यांनी दिलेले पर्यावरणविषयक विचार मानवाच्या जीवनासाठी तसेच प्रदुषणरूपी राक्षसापासून वसूंधरेला वाचविण्यासाठी महत्वाचे ठरतात. हे अनमोल विचार जाणून घेणे हा या संशोधना मागचा उद्देश आहे.

५)संशोधन —

५ अ) पर्यावरण —

सर्वसाधारणपणे पर्यावरण सभोवतालची परिस्थिती असे असले तरी उत्पत्तीशास्त्राच्या दृष्टीने पर्यावरण म्हणजे पृथ्वीवरील विशिष्ट भागाशी निगडीत असलेली सभोवतालची परिस्थिती होय Environ म्हणजे To

Saaurround या मुळ फ्रेंच भाषेतील शब्दापासून "Environment' अशी इंग्रजी शब्द प्रचलीत झाला आहे. यालाच मराठी भाषेत पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरणाच्या काही व्याख्या पुढील प्रमाणे –

१) **हर्सकोव्हिट एम.जे.** : पर्यावरण म्हणजे सर्व बाहय परिस्थितीचे आणि प्रभावाचे एकत्रिकरण आहे,जे पृथ्वीच्या पृष्ठभागावर सजीवांच्या विकासचक्राला प्रभावित करत असते.

२) **पार्क सी** : विशिष्ठ वेळी,विशिष्ठ ठिकाणी मानवाला वेढणारी जी नैसर्गीक किंवा सांस्कृतीक परिस्थितीची एकात्मीक अवस्था असते तिलाच पर्यावरण असे म्हणतात.

३) **जैकी स्मिथ** : सजीवाने अनुभवलेल्या प्राकृतिक, रासायनिक व जैविक परिस्थितीची गोळाबेरीज म्हणजेच पर्यावरण. त्यात हवामान, मृदा, जल, प्रकाश, आसपासच्या वनस्पती,सजीवाच्या स्वतःच्या जातीचे अन्य सदस्य तसेच इतर सजीव जातीचे सदस्य यांचा समावेश होतो. पर्यावरणाची स्थिती, दिवसाची वेळ, ऋतू, हवास्थिती व अन्य घटकानुसार बदलते.

४) **विश्व शब्दकोश** : पर्यावरण त्या सर्व परिस्थिती, प्रणाली (तंत्र) व प्रभावांचे एकत्रिकरण आहे जे सजिवांच्या व त्यांच्या प्रजातीच्या विकास, जीवन व मृत्युला प्रभावित करीत असते.

एकंदरीत पर्यावरण ही संकल्पना अतिशय गुंतागुंतीची आणि बहुव्यापक आहे. सर्वसामान्यपणे पर्यावरण ही संकल्पना निसर्ग या अर्थानेही रूढ मानली जाते. त्यामुळे पर्यावरण ही प्राकृतिक आणि जैविक संकल्पना आहे. ज्यामध्ये पृथ्वीवरील जैविक व अजैविक घटकांचा समावेश होतो. जैविक घटकांचे पृथ्वीतळावरील अस्तित्व निसर्गनियमांनी बध्द अशा संतूलित परिसंस्थावर अवलंबून आहे. विविध परिसंस्थातील समतोल निसर्गनियमावर आधारभूत असतो. पर्यावरणातील मानवाच्या अतिरेकी हस्तक्षेपांमुळे प्रदूषण, नागरीकरण, उर्जाक्षय, वृक्षतोड, अवर्षण, ओझोनक्षय इत्यादी सारख्या भयानक समस्या निर्माण झाल्या आहेत.

पर्यावरणाचा समतोल टिकून राहणे हे पृथ्वीवरील संपूर्ण सजीवदृष्टीच्या अस्तित्वासाठी अत्यंत गरजेचे आहे. मानव हा पर्यावरणातील एक क्रियाशील व बुध्दिमान प्राणी असून तो पर्यावरणाचा एक घटक आहे. त्यामुळे पर्यावरण रक्षणाची मानवाचीच आहे. पर्यावरणीय समस्या निर्माण मानव हाच एकमेव घटक कारणीभूत आहे. पर्यावरण संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी मानवा यासाठी समाजात जनजागश्ती निर्माण होणे ही काळाची गरज आहे.

५ ब) ढासळलेले पर्यावरण –

निसर्ग हेच परमेश्वराचे नांव आहे. नि वावरणारे पशुपक्षी झाडे हे देवांचे अवतार किंवा वाहने आहेत अशी येथील लोकांची श्रध्दा होती. तोडल्यामुळे किंवा प्राण्यांची हत्या केल्यामुळे देवदेव कोप होईल अशी त्यांना भिती वाटत होती. या भितीप त्याकाळी भारताच्या एकूण जमीनीपैकी ८७ ट जमीन जंगलांनी व्यापलेली होती. अगणित पशु सुखाने नांदत होती. परंतू गेल्या शतकात तर मानव सुधारणेच्या व निसर्गावर विजय मिळविण्याच्या हव्यासापायी जंगलाचा आणि वन्य प्राण्यांचा प्रचं प्रमाणात विनाश केला. येथील श्रध्देवरही आक्रमण केले. देवीचे वाहन म्हणून ज्यांच्याकडे श्रध्दायुक्त भितीने पाहिले जायचे अशा हजारे वाघ, सिंहाची शिकार केली. एकूण भूमीपैकी भारतात सध्या ८ टक्के भागावर जंगल शिल्लक राहीलेले आहे. शिकार, मांसाहार, युध्दा, अणुस्फोट, वायुगळती सारख्या मानवनिर्मित दुर्घटना यामुळे काही वन्यप्राणी, पक्षी, झाडांच्या व सरपटणाऱ्या प्राण्यांच्या जाती नष्ट होऊ लागल्या. पर्यावरणाचे संतूलन बिघडले, एके काळी समृध्द असलेले अरण्यजीवन संपुष्टात येवू लागले.

मानवाने निसर्गचक्राला छेद दिल्यामुळे त्याचे दुष्परिणाम पहावयास मिळत आहेत. जागतिक तापमानात प्रचंड वाढझाली आहे. वाढते शहरीकरण, वृक्षतोड, नैसर्गिक जलचक्रातील बदल, ओझोन वायुचा क्षय, कार्बनडाय ऑक्साईडचे वाढते प्रमाण, विविध अणुचाचण्या, औद्योगीकरणाचा विकास, जलप्रदुषण, किटकनाशके व जंतूनाशके यांचा वाढता वापर, मातीची धुप, नैसर्गिक खनिजांचा व तेलांचा वाढता वापर, गतीमान मानव व अस्थिर पर्यावरण, धोक्यात आलेली हवामान परिसंस्था, जंगलकटाई, अतिचराई, स्वयंचलीत

वाहनांचा वाढता वापर, वातानुकुलीत यंत्रे व शितकरण यंत्राचा अधिक वापर, आदि विविध कारणांमुळे जागतिक तापमानात वाढ झाली आहे. परिणामी ज्वालामुखी, ढगफुटी, त्सुनामी, वाळुंचे वादळे, भुकंप, महापूर, दुष्काळ, विविध आजार, निर्माण झाले आहेत. या सर्वाचा फटका मानवालाच बसत आहे. प्रगतीच्या नावाखाली मानवाने निसर्गाची अडवणूक सुरू केली आहे. या वेगाने हवा, पाणी व जमीनीचे प्रदुषण होत गेले तर मानवांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागेल व त्याचे अस्तित्व आपोआपच नष्ट होईल.

निसर्गचक्रातील माणसाचा वाढता हस्तक्षेप हाच त्याच्या ऱ्हासास कारणीभूत बनला आहे. यातून सुटका करून घ्यायची असेल तर पुन्हा एकदा मानवाला निसर्गाशी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या भावनेने नाते निर्माण करावे लागेल.

५.क) संतश्रेष्ठ तुकारामांचा पर्यावरण विचार :—

आज सामाजिक समरसतेसोबतच पर्यावरण रक्षणाची जाणीव समाजात दृढ होणे आवश्यक आहे. यासाठी फक्त कायदे करून भागणार नाही तर त्यासाठी समाजमन जागृत करावे लागेल. पर्यावरण रक्षणाची संवेदना निर्माण होणे अत्यंत महत्वाचे आहे. सभोवती असलेला निसर्ग हवा, पाणी वनस्पती, खनिजे पशु—पक्षी आदींचा पर्यावरणात समावेश होतो. पर्यावरण रक्षणाची सुरूवात आपल्याला या सभोवतीच्या रक्षणापासूनच करावे लागेल.

पंचमहाभूतांचा आणि जीवाच्या पंचज्ञानेंद्रीय आणि पंचकर्मंद्रीयांचा परस्परांशी अन्योन्न संबंध आहे. ही जाणीव जागृती दृढ होताच पर्यावरणातली मानव, प्राणी, पशु, पक्षी, वृक्ष, सागर, नदया, पवर्तराजी, हवा, पाणी इत्यादींच्या संरक्षण व संवर्धनविषयी संवेदना निर्माण होवून मानवाच्या हातून यथार्थ व्यवहार घडण्यास मदत होते. हे लक्षात घेउन संतश्रेष्ठ तुकारामांनी निसर्गाला मानवाशी जोडण्याचा प्रयत्न आपल्या अभंगामधून केला आहे.पर्यावरण रक्षणासाठी समाज पुरूषाला कार्यतत्पर करण्याचे काम संत तुकारामांनी केले.

पर्यावरण हे माझे अविभाज्य अंग आहे, समग्र पर्यावरण माझ्या सेवेत रत आहे म्हणून मीही त्याच्या सेवेत रत व्हावे ही भावना दृढ होताच पर्यावरणातील वृक्ष—वल्ली, सागर, नदया पर्वतराजी, पशु, पक्षी, प्राणी ही सोयरी होतात, जीवलग मित्र होतात. पर्यावरणाविषयी आत्मीयता प्रेमभावना जागृत होवून सदैव आपल्या सेवेत असलेल्या पर्यावरणाविषयी रक्षणाची व संवर्धनाची जाणीव जागृती निर्माण होते. संवेदना निर्माण होते, पर्यावरणाविषयी अतूट नाते जुळते या जाणीव जागृतीने प्रेरित झालेल्या तुकाराम महाराज म्हणतात,

''वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें ।
पक्षी ही सुस्वरें आळविती ।। १।।
येणें सुखें रूचें एकांताचा वास ।
नाहीं कळो येत दुःख अंगा ।। २।।
आकाश मंडप पृर्थिवी आसन ।
रमे तेथे मन क्रिडा करी ।। ३।।
कथाकमंडलू देहउपचारा ।
जाणवितो वारा अवसरू ।। ४।।
हरिकथा भोजन परवडी विस्तार ।
करोनि प्रकार सेवूं रूची ।। ५।।
तुका म्हणे होय मनासी संवाद ।
आपुलाचि वाद आपणासी'' ।। ६।।
।। तु.गा.३०७ ।।

मानवाच्या मानसिक, आत्मीक विकासास सहाय्यभूत ठरणाऱ्या निसर्गाचे, पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण करणे मानवाचे आद्य कर्तव्य ठरले पाहीजे, सोयऱ्याशी ज्या आपुलकीने, प्रेमाने आपण वागतो तसे आपुलकीचे, प्रेमाचे नाते निसर्गाशी असले पाहीजे. त्याच भावनेने निसर्गाचे, पर्यावरणाचे, वृक्षांचे रक्षण केले पाहीजे, संवर्धन केले पाहीजे असेही तुकाराम महाराज सुचवितात.

पर्यावरणाचा घटक म्हणजे वृक्ष, वेली. हया घटकाचे जतन, संगोपन, संवर्धन करून पर्यावरणाचा समतोल राखला पाहीजे असे विचार अध्यात्माच्या अनुषंगाने तुकाराम महाराज सर्वासमोर मांडतात. जीव—शीव—ऐक्य हा अध्यात्माचा मुख्य सिध्दांत तुकोबारायांनी तरू आणि बिजाच्या रूपातून समजावून दिला आहे,

''तरूवर बीजापोटी । बीज तरूवरासेवटी ।
तैसें तुम्हां आम्हां जालें । एकीं एक सामावले''

।। तु.गा.१७१८।।

तसेच

'फळे तेचि बीज बीज तेची फळ । उपमानावे मूळ न पालटे' ।। तु.गा.२४२७।।

'बीज म्हणजेच फळ आणि फळ म्हणजेच बीज' अशी या दोघांमध्ये अभिन्नता आहे. बीज आणि फळ ही त्याची फक्त उपनावे आहेत. बीज हेच कोणत्याही वनस्पतीचे सारभूत तत्व होय. बाकीचा विस्तार मधेच येतो आणि नंतर लश्प्तही होतो हा आशय सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

'तुका म्हणे बीजें बीज दाखविले । फल पुष्प आले गेले वाया'' ।। तु.गा.३५५८।।

बीज अंकूरापासून फळापर्यंत नाना रूपे धारण करते, पण अखेरीस स्वतःच सारखे बीजच दाखविते. एका दृष्टीने मधे आलेली पाने, फुले, फळे ही जणू काही वायाच जातात. सैध्दांतिक दृष्टया स्वरूप ठरविण्याच्या तात्वीक दृष्टीने पाहता हा सगळा प्रवास बीजापासून बीजापर्यंत असतो. तसे पाहिजे तर पाने, फुले, फळे वाया जात नाहीत. त्यातूनही सृष्टीचे एक देखणे लावण्यच व्यक्त होते. पण या सर्व पदार्थाचे मूलभूत तत्व ठरवितांना बीज तत्वालाच प्राधन्य दिल्या जाते. अशा बीजाच्या संवर्धनासाठी ते आवाहन करतात की,

'बीजे बीज वाढवा'' ।। १२०९।।

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी, जगाला वृक्षदान देण्यासाठी बीजाला स्वतःचे समर्पण दयावे लागते, जीवीत्वाची आहूती दयावी लागते. मानव मात्र बीजाच्या समर्पणाला समजून घेत नाही आधूनिकतेच्या हव्यासापोटी बीजाच्या आहुतीतुन निर्माण झालेल्या वृक्षांची कत्तल करून त्यांच्या समर्पणाची थट्टाच उडवतो.

''एका बीजा केला नास । मग भोगिले कणीस
लाभ नाही फुकासाठी । केल्यावीण जीवासाठी
तुका म्हणें रणीं । जीव देतां लाभ दुणी''

।। तु.गा.३५५८।।

बीज स्वतःच्या गाभ्यामधून अंकुराला जन्म देते, ते त्या अंकुराला जन्म दिल्यानंतर स्वतः माती मध्ये विलीन होउन जाते. एकीकडे एका बीजाचा नाश होतो पण दुसरीकडे त्याच्या अस्तित्वाचा अंश पाच पन्नास, शे–दोनशे दाण्यांनी ओतप्रोत कणीस निर्माण होते. बहरलेले कणीस हवे अ एका बीजाला आत्मनाश करून घेणे अपरिहार कोणाचा तरी जीव समर्पीत केला जातो आणि आत्मसर्पणाची फळे इतरांना चाखायला पि सैनिकाचे रणांगणात आत्मसमर्पण होते आणि आत्मसमर्पणातून देशाचे रक्षण केले जाते. म बीजाच्या आत्मसमर्पणाला समजून आत्मसमर्पणातून निर्माण झालेल्या वृक्षराजीवर चालवू नये. वृक्ष संगोपन करून स्वतःचे, पर्यावरणाचे जतन, संगोपन करावे. 'बीजापोटी निर्माण होत असतात. ज्या बीजातून वृक्ष वाढ आहे ते बीज शुध्द असायला हवे असेही ते सुचवि

'शुध्दबीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं'' ।। तु.गा.२०६२।।

शुध्द बीजापोटीच रसाळ आणि चांगली फ मिळतात. संकरातून निर्माण झालेल्या फळांमधला क होत गेलेला गोडवा आज आपण अनुभवतो आ संकरामुळे फळांच्या, भाज्यांच्या मूळ चवीत बदल झालेला आहे. शुध्द बीजापासून शुध्द रूपाचेच फळ तयार होते हे सांगतांना ते म्हणतात,

''अमृताचि फळें अमृताची वेली । ते चि पुढें चाली बीजाची ही''।। तु.गा.२०२९।।

अमृतांच्या वेलीला आलेल्या अमृतफळापासून पुन्हा अमृताचेच बीज तयार होते आणि अमृत तत्वच पिकून सर्वत्र समृध्दी नांदते. तेंव्हा उत्तम वृक्षांचे फळांचे बीज जतन करावे ते नष्ट होवू नये याची काळजी घ्यावी. निसर्गातील जैव विविधता टिकून राहण्यासाठी सर्वच प्रकारच्या वृक्ष वेलीची आवश्यकता असते. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी नष्ट होत चाललेल्या दुर्मिळ प्रजातींच्या शुध्द बीजाचे जतन होणे आवश्यक आहे. अशा शुध्द बीजाच्या रोपनातून अंकुरलेल्या कोवळया अंकुराची काळजी घेणे आवश्यक आहे.

'सिंपिले ते रोप वरीवरी बरे । वाळलिया पुरे कोंभ नये । किंवा बीयाचे अंकुर दग्ध होती'' ।।

असे सांगनू तुकोबारायांनी नुकत्याच अंकुरीत झालेल्या रोपाची भरपूर पाणी घालून काळजी घ्यावी

...सल्ला दिला आहे. बाळरोपाला वेळोवेळी पाहिजे त्या प्रमाणात पाणीच दिल्या गेले नाही तर त्या वाळलेल्या कोंभाला काय परत कोंभ फुटणार आहेत ? असा प्रश्न ही ते विचारतात. म्हणूनच वृक्षाच्या मुळाला भरपूर पाणी घातल्यावरच वश्क्ष वाढणार आहे.

...जतन करीतां मुळ । वृक्ष बोल्हावें सकळ'' ।

रोपाच्या संवर्धनातूनच वृक्षाची फळे मिळणे ही संकल्पना तुकोबांनी आध्यात्मीक सिध्दांताला जोडून मांडली आहे. पर्यावरण संतुलन साधावे म्हणून आज मोठया प्रमाणात वृक्षारोपन केले जाते. वृक्षारोपनाचे मोठमोठे कार्यक्रम आयोजीत केले जातात, फोटो काढल्या जातात, परंतु लावलेले रोप जगले का ? याचा विचार कोणीच करत नाही. दरवर्षी त्याच खड्डयात रोप लावली जातात. त्याचे संगोपन केले जात नाही. संवर्धनासाठी प्रयत्न केले जात नाही या पार्श्वभूमीवर 'बालरोपांची काळजी घ्यावी' हा तुकारामांचा संदेश सर्वांनी अमलात आणला पाहीजे.तरच जागतीक तापमान वाढीच्या राक्षसाचा आपण नि:पात करू शकू अन्यथा पृथ्वीचा नाशासाठी आपणही कारणीभूत ठरू.

एखादा दाता आपल्या दारी याचक आल्यावर त्याला भरपूर दान देवून त्याची तृप्ती करतो. तसेच वृक्ष हा मानवरूपी याचकाला पत्र, पुष्प, फुल, मुळ, छाया, साल, लाकूड हे आपल्या जवळील सर्व संतुष्टपणाने देवून निसर्गातील मोठा दाता म्हणून आपल्यासमोर उभा राहतो.

'तेथे माझया मना होइ पक्षीराज ।
साधावया काज तृप्तीचेया ।
तुका म्हणे क्षणाक्षणा जावो काळ ।
गोडी ते रसाळ अंतरेल।''

तुकारामांनी वर्णन केल्याप्रमाणे सर्वांनी वृक्षवेलीविषयी अशी भूमिका घेतली. तर पर्यावरणातील वृक्षांचे महत्व समजून वृक्षसंवर्धनाला गती मिळेल आणि निसर्गाचा आनंदही लुटता येईल. ज्यांचे रक्षण पर्यावरणाच्या दृष्टीने करायला हवे त्यांचे रक्षण होत नाही आणि नको त्या गोष्टीच वाढल्या जावून काय सार हाती लागणार आहे असा प्रश्न तुकाराम महाराजांनी एका अभंगातून केला आहे,

'तोडूनि पुष्पवाटिका फळवृक्षयाती । बाभळा राखिती करूनि सारे ॥ १॥
कोण हि तेणें देखिलें आपुलें । आणिक पाहिलें सुखं काई ॥ २॥
तुका म्हणे त्यास नाईके सांगता । तया हाल करीतां पाप नांही'' ॥ ३॥

सुगंधी फुलांची पुष्पवाटिका, मधुर फळ वृक्षांच्या जातींचा नाश करून काय साधणार आहे. वृक्षतोड करून मानव पर्यावरणाचा समतोल बिघडवीत आहे. स्वत:चे हित कशात आहे. याचेही भान त्याला नाही. निसर्गावर विजय मिळविण्याच्या नादात स्वत:चा आणि आपल्या भावी पिढयांच्या जीवणावर ढासळत्या पर्यावरणाचा काय परिणाम होईल याची चिंताही तो करीत नाही. वृक्षतोड हे पापाचारण आहे हे सांगूनही त्याला पटत नाही. अविचाराने वागून निसर्गदेवतेचा रोष ओढवून घेतो आहे. हया पुष्पवाटिका म्हणजे आत्मविकास करून घेण्याच्या पायरीतील मोलाचा दगड आहेत. याच्या सानिध्यात मन पवित्र, एकाग्र, शांत होते. त्यांना उध्वस्त करून मानव स्वत:च्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहे. वृक्षराजींचे जतन करून मानवाने स्वत:चे भविष्य सुरक्षित करावे असा सल्ला तुकाराम महाराज देतात.

नैसर्गीक वातावरण, एकांत, दाट वनश्री, पशु पक्ष्यांची संगत यामुळे वने म्हणजे नैसर्गिक आनंदाची साठवण ठरतात. निसर्गाच्या सानिध्यात चित्तवृत्ती प्रफुल्लीत होतात. वनाच्या सानिध्यात चिंतनासाठी एकांत मिळतो. गिरीकुहरात मनाची एकाग्रता साधून फक्त परमात्मरूपच दिसू लागते. या अवस्थेचे वर्णन करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

समारोप :—

आज मानवाच्या हव्यासामुळे व विविध कारणांमुळे निसर्गाचे संतूलन ढासळले आहे. पाणी, हवा आणि ध्वनी प्रदुषण मोठया प्रमाणात वाढले आहे. पर्यावरणाची दृष्टी लोपली आहे. एकीकडे वाढलेली कारखौनदारी त्यातून निर्माण होणारे प्रदूषण, दुसरीकडे जंगलतोड, पशु संपत्तीचा ऱ्हास त्याचा पर्जन्यमानावर गंभीर परिणाम होत आहे. पर्यावरणासाठी आता लोकशिक्षणाची गरज निर्माण झाली आहे आणि नेमकी हिच भूमिका संतश्रेष्ठ तुकारामांची होती. संतश्रेष्ठ

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
UGC Approved Jr.No.62759
Vidyawarta® | Jan. To March 2018 Issue-21, Vol-04 | 010

तुकारामांनी भक्ती,चिंतन आणि मूल्यांची शिकवण दिली. तसेच ज्या पर्यावरणाच्या सानिध्यात मानवी देह वावरणार आहे ते पर्यावरण शुध्द असले पाहीजे अशी त्यांची धारणा होती म्हणूनच त्यांनी निसर्गातील सर्व घटकांचे मोठेपण सिध्दांत, दृष्टांत,उपमा,रूपक स्वरूपात उभे करून गायले आहे. ज्या काळात संतश्रेष्ठ तुकारामांनी पर्यावरणाची शिकवण दिली. त्या काळात प्रदूषणाची कोणतीही समस्या नव्हती. पर्यावरण घटकावर आजच्या सारखी आक्रमण नव्हती. पर्यावरणाचे संतूलन राखले जात होते. तरी देखील संतश्रेष्ठ तुकारामांनी दिलेली पर्यावरणाची शिकवण, त्यांची दश्ष्टी किती दुरगामी होती याची जाणीव करून देते. आज पर्यावरण रक्षणासाठी संतश्रेष्ठ तुकारामांचा पुढील मंत्र जनमानसात रोपीत केला गेला पाहीजे एवढे मात्र निश्चितकृ

'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी । पक्षीही सुस्वरे आळविती ।।''

निष्कर्ष :—

१) पर्यावरणाचा मोठया प्रमाणात ऱ्हास होत आहे.

२) पर्यावरण रक्षणासाठी लोकशिक्षणाची गरज आहे.

३) संतश्रेष्ठ तुकारामांच्या वाङ्:मयातून पर्यावरण रक्षणासाठी दृष्टी मिळते.

४) संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार पर्यावरण रक्षणासाठी अनमोल आहेत.

५) संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरण विषयक विचारांची अंमलबजावणी केली गेल्यास पर्यावरण रक्षण करता येईल. पर्यावरणाचा ढासळता समतोल राखता येईल.

६) संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार वसुंधरेच्या रक्षणासाठी उपयोगी ठरतील.

संदर्भ सूची :

१) गोसावी र.रा. — पाच भक्तीसंप्रदाय मेहता पब्लीशिंग हाउस पुणे, द्वितीयावृत्ती १९९८

२) घारपूरे विठ्ठल — पर्यावरणशास्त्र पिंपळापुरे प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती जून—५

३) तुळपुळे शं.गो. — पाच संतकवी व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती १९६२

— यादवकालीन मराठी भाषा ... प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती १९७३

४) देशपांडे अ.ना. — प्राचीन मराठी वाङ्... समीक्षा व जोशी म.रा. व्हिनस प्रकाशन पु... द्वितीयावृत्ती जाने. १९९५

— प्राचीन मराठी वाङ्:मयाचा इति... (भाग दुसरा) व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती ... १९९६

— प्राचीन मराठी वाङ्:मयाचा इतिहा... (भाग तिसरा) व्हिनस प्रकाशन पुणे, द्वितीयावृत्ती ऑग... १९७३

५) मोहरील ल.का. — संत तुकारामांची जीवननिष्ठा सविता प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती फेब्रू.२००३

६) रानडे रा.द. — तुकाराम वचनामृत

२) संपादित ग्रंथ :

१) कमल अशोक — श्री. तुकाराम गाथा, गुरूकुल प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००४.

□□□